ePaper
# दादा भुसेंच्या पुत्राचा भावी खासदार असा उल्लेख, भाजपमध्ये अस्वस्थता




| वर्ष - 6 I अंक - 233 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- फुरसुंगी-उरुळी गावांसाठी नवीन नगरपालिका
- भाजपाचे माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांचा 'सर्जिकल स्ट्राईक'
- केंद्रातील महाशक्ती महाराष्ट्राचे तुकडे करायला निघाली


www.mahaenews.com | बुधवार | दिनांक 7 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शाळा आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानावे

# तरच मनपा शाळांचा दर्जा उंचावेल!

## आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केला विश्वास



### शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते दृढ करणे आवश्यक

**आदित्य बिर्ला फाउंडेशनचे प्रदिप होरा यांनी बदलत्या शिक्षण पध्दतींबददल शिक्षकांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या जिवनात बदल घडविण्यासाठी आई-वडीलांप्रमाणे मुख्याध्यापक आणि शिक्षकांची भूमिका महत्वपूर्ण ठरते. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते अधिक दृढ करणे आवश्यक असून आजच्या बदलत्या तंत्रज्ञानाचा कला अवलंब करता येईल, याबाबत श्री. होरा यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक उपआयुक्त संदीप खोत यांनी केले. सूत्रसंचालन गणेश लिंगडे तर आभार अनिता जोशी यांनी मानले.**

**।पिंपरी ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शाळा आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने सर्वांगीण प्रयत्न केल्यास महापालिका शाळांचा दर्जा निश्चितपणे उंचावणार असून आधुनिक युगात विविध स्पर्धांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना बळकटी मिळेल, असा विश्वास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि आदित्य बिर्ला फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेच्या शाळेतील प्राचार्य आणि शिक्षकांची क्षमता वाढीबाबत प्रशिक्षणाचे शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. चिंचवड येथील ऑटोक्लस्टर येथे आज प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते झाले. त्यावेळी उपस्थित महापालिका शाळांचे प्राचार्य आणि शिक्षकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे उपआयुक्त संदीप खोत, स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीलकंठ पोमण, प्रशासन अधिकारी संजय नाईकडे, आदित्य बिर्ला फाउंडेशनचे प्रदिप होरा, सुकृत साठे, प्रशांत साळुंखे यांच्यासह केपीएमजी सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांची महत्वाची भूमिका असते. ज्या विद्यार्थ्यांची आकलन क्षमता कमी आहे, जे विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे आहेत, अशा विद्यार्थ्यांवर शिक्षकांनी विशेष लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून शहराचा नावलौकिक वाढविला आहे. तरी देखील यामध्ये सुधारणेला वाव असून महापालिका शाळांचा दर्जा अधिकाधिक वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यास सर्वांचा सकारात्मक प्रतिसाद अपेक्षित आहे. शिक्षकांवरील अतिरिक्त ताण कमी करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. आकांक्षा फाउंडेशनचे मॉडेल सर्व शाळांमध्ये राबविण्याचा महापालिकेचा मानस आहे. त्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षकांचा सहभाग महत्वाचा आहे. शिक्षकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही देखील जबाबतदारी पार पाडायला हवी. पोषक आहारा संदर्भात विद्यार्थ्यांच्या पालकांशी सुसंवाद साधून त्यांना त्याबद्दल सांगणे गरजेचे आहे.

## शहर भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून आदरांजली

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भाजपातर्फे अभिवादन

## पिंपरीतील डॉ. आंबेडकर चौकात मान्यवरांची उपस्थिती

**।पिंपरी-चिंचवड ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील मुख्य चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.**

यावेळी माजी राज्यसभा खासदार अमरजी साबळे, नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी स्थायी समिती सभापती नितीन लांडगे, माजी सत्तारूढ पक्ष नेते नामदेव ढाके, दक्षिण भारत आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस विजय फुगे, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, सुजाता पलांडे, शैला मोळक, मनोज तोरडमल, सुभाष सरोदे, कोमल शिंदे, धनराज बीरदा, दीपक नागरगोजे, सतीश नागरगोजे, मंगेश धाडगे, सचिन उदागे, गिरीष देशमुख, कैलास सानप, प्रमोद ताम्हणकर, संतोष मोरे, गणेश ढाकणे, हेमंत देवकुळे, समीर जावळकर, प्रशांत बाराथे, संजय परळीकर आदी उपस्थित होते.

माजी राज्यसभा खासदार अमर साबळे म्हणाले की, हजारो वर्षांपासून शिक्षण नाकारलेल्या कनिष्ठ जातींमध्ये अज्ञान व निरक्षरता होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कनिष्ठ जातींना त्यांच्या या दयनीय स्थितीचे कारण शिक्षणाचा अभाव



हेच आहे याची जाणिव करून दिली. कनिष्ठ जातींच्या लोकांनी त्यांच्या मुलांना शाळेत पाठवावे यासाठी बाबासाहेबांनी त्यांना प्रोत्साहन दिले. त्यामुळेच आज दलित समाज सुशिक्षित झाला. भारतीय संविधानाचे शिल्पकार असलेल्या डॉ. बाबासाहेबांमुळेच आपल्याला शिका...संघटित व्हा आणि संघर्ष करा.. हा मूलमंत्र मिळाला.

### शहराध्यक्ष महेश लांडगे यांची दिल्लीत आदरांजली...

**दरम्यान, भारतीय जनता पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनाच्या आवारात उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास वंदन केले. बैलगाडा शर्यतीच्या सुनावणीसाठी आमदार लांडगे दिल्लीत दाखल झाले आहेत. महापरिनिर्वाण दिनानिमित्त लांडगे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पांजली वाहिली.**

# फुरसुंगी-उरुळी गावांसाठी नवीन नगरपालिका

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा निर्णय

पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या फुरसुंगी आणि उरुळी देवाची या गावांची नवी नगरपालिका करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. या नगरपालिकेच्या माध्यमातून या गावांतील नागरिकांच्या नागरी सुविधांचा प्रश्न मार्गी लागेल. तसेच नागरिकांच्या सहभागातून ही नगरपालिका विकास कामांमध्ये सर्वोत्कृष्ट ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.**

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांतील मालमत्ता कर व मुलभूत सोयी सुविधांबाबत मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा शासकीय निवासस्थानी बैठक पार पडली. या बैठकीस माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, पुणे जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्यासह या दोन्ही गावांतील स्थानिक नागरिक उपस्थित होते.



यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले, “फुरसुंगी आणि उरूळी देवाची येथील नागरिकांनी आपली नगरपालिका राज्यातील सर्वोत्कृष्ट अशी नगरपालिका ठरावी, यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तसेच पुणे नगरपालिकेने या दोन्ही गावांत नागरी सुविधांशी संबंधित सुरू केलेल्या प्रकल्प, योजनामंध्ये सहकार्य देणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.


पुणे महानगरपालिकेमध्ये २०१७ मध्ये ११ गावे समाविष्ट करण्यात आली होती. त्यामध्ये या फुरसुंगी आणि उरूळी देवाची या गावांचा समावेश होता. या दोन्ही गावांची मिळून सुमारे अडीच लाख इतकी लोकसंख्या आहे. ही बाब लक्षात घेता, या दोन गावांना नवीन नगरपालिका देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारकडून घेण्यात आला आहे.

> **“फुरसुंगी आणि उरूळी देवाची येथील नागरिकांनी आपली नगरपालिका राज्यातील सर्वोत्कृष्ट अशी नगरपालिका ठरावी, यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तसेच पुणे नगरपालिकेने या दोन्ही गावांत नागरी सुविधांशी संबंधित सुरू केलेल्या प्रकल्प, योजनामंध्ये सहकार्य देणे अपेक्षित आहे. त्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.**

## खडकवासला ते फुरसुंगीपर्यंतच्या भूमिगत बोगद्याचा अहवाल जलसंपदाकडे विभागाकडे सुपूर्द

पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खडकवासला धरणातून नवीन मुठा कालव्यातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याची चोरी, बाष्पीभवन, गळती यावर उपाय म्हणून शहरातून वाहणारा हा कालवा भूमिगत करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पासाठीचा प्राथमिक अहवाल संबंधित कंपनीने जलसंपदा विभागाकडे सुपूर्द केला आहे. या अहवालाची छाननी करून तो मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविला जाणार आहे. या प्रकल्पाचा डीपीआर तयार करण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत.**



त्यानुसार निविदा मागवून एका खासगी कंपनीला हे काम देण्यात आले. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यासाठी ज्या मार्गाने बोगदा जाणार आहे, त्या मार्गावरील जमिनींची (मृदा) तपासणी करण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी प्रत्येक अर्धा किलोमीटर अंतरावर बोअर खोदण्यात आले होते. प्रकल्पाचा प्राथमिक अहवाल संबंधित कंपनीने जलसंपदा विभागाकडे सुपूर्द केला असून जलसंपदाकडून अहवालाची छाननी सुरू आहे. याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून तो मान्यतेसाठी जलसंपदा विभागाकडून शासनाकडे पाठविला जाणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, भूमिगत बोगदा करताना ब्लास्टिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. परिणामी शहरातील इमारतींना धोका पोहोचू शकतो. त्यामुळे शहरातील इमारतींच्या खालून बोगदा करण्याचा मार्ग बदलण्यात आला आहे. खडकवासला ते फुरसुंगी परिसरातील नागरी वस्ती नसणाऱ्या भागातून बोगदा प्रस्तावित करण्यात आला असून या प्रकल्पासाठी तब्बल दोन हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. खडकवासला ते फुरसुंगी दरम्यान कालव्याची दोन हजार हेक्टर जागा असून या जागेची किंमत चालू बाजार मूल्य तक्त्यानुसार (रेडीरेकनर) १२ ते १५ हजार कोटी रूपये आहे, असेही जलसंपदा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

७.८० मीटर रूंद, ३.९० मीटर उंच आणि १.९५० मीटर गोलाकार उंच अशा आकाराच्या बोगद्यातून खडकवासला ते फुरसुंगी दरम्यान बोगद्यातून पाणी नेण्याचा प्राथमिक आराखडा निश्चित करण्यात आला आहे. या बोगद्यामुळे कालव्याची क्षमता १५१० क्युसेक होणार असून ते सर्व पाणी गुरुत्वाकर्षणाने फुरसुंगीपर्यंत नेण्याचे प्रस्तावितत आहे.

## राज्यात पाच हजार बायोगॅस संयंत्रे उभारणार

### केंद्राच्या योजनेचा कोल्हापूर, पुणे, नगरला सर्वाधिक लाभ

पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंतर्गत राज्यात पाच हजार बायोगॅस संयंत्रे उभारण्यात येणार आहेत. या योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या मार्फत होणार असून, कोल्हापूर, पुणे, नगर जिल्ह्याला सर्वाधिक उद्दिष्टे दिली आहेत. पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मितीला चालना मिळावी, शेतीला सेंद्रिय खत मिळावे म्हणून केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने देशभरात बायोगॅस संयंत्रे उभारण्याची योजना आखली आहे. त्यानुसार राज्यात ५२०० संयंत्रे उभारली जाणार आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात ८९७, पुण्यात ५०५, नगरमध्ये ४७४, संयंत्रे उभारली जाणार आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यांना संयंत्रांचे उद्दिष्टे ठरवून दिलेले असून, याची अंमलबजावणी मार्चअखेर जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात येणार आहे. त्या बाबतचे पत्र राज्याच्या ग्रामविकास मंत्रालयाने सर्व जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठविले आहे. बायोगॅस संयंत्रांना शौचालय जोडणी करण्यास प्रोत्साहन देण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे.



> **“ बायोगॅस संयंत्रे उभारण्याच्या केंद्राच्या योजनेचा फायदा सर्वसामान्य लोकांना होणार आहे. बायोगॅस असेल तर एलपीजी गॅसची गरजच लागत नाही. पुणे जिल्हा परिषद बायोगॅसचा व्यावसायिक वापर वाढविण्यावर भर देत आहे. संपूर्ण गावाने, वस्तीने बायोगॅस प्रकल्प सुरू करावा, आपल्या गरजेइतका वापर होऊन शिल्लक बायोगॅस उद्योगांना पुरवावा, असे नियोजन सुरू आहे. या संयंत्रातील स्लरीचा वापर सेंद्रिय खत म्हणून होतो. जिल्ह्यात विविध योजनांमधून बायोगॅस संयंत्रे उभारली जात आहेत.**
> **– आयुष प्रसाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे**

### अपारंपरिक ऊर्जा धोरणाला बळ

पर्यावरणाची हानी टळावी, पारंपरिक ऊर्जेचा वापर कमी होऊन अपारंपरिक किंवा नवीन व नवीकरणीय ऊर्जा वापरला आणि उत्पादनाला चालना मिळावी, यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केली आहे. मागील वर्षी या बाबतचे कोणतेही उद्दिष्टे ठरवून दिले नव्हते, पण, यंदा उद्दिष्टे ठरवून दिलेले आहे आणि ते मार्चअखेर पूर्णही करावयाचे आहे.

# भाजपाचे माजी नगरसेवक कुंदन गायकवाड यांचा 'सर्जिकल स्ट्राईक'!

## राष्ट्रवादीचे विकास साने यांचा 'बनाव' उघड : चिखलीतील पाणी पुरवठ्यावरून राजकारण

पिंपरी ।
। महाईन्यूज ।

**आंद्रा प्रकल्पाचे पाणी पिंपरी-चिंचवडकरांना उपलब्ध करण्यासाठी चिखली येथे उभारण्यात आलेला जलशुद्धीकरण प्रकल्प अल्पावधीतच कार्यान्वयीत होणार आहे. त्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघासह शहराला पाणी पाणीपुरवठा करणे सुलभ होईल, असा दावा केला जात आहे.**



मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संभाव्य इच्छुक उमेदवार आणि सामाजिक कार्यकर्ते विकास साने यांनी दोन दिवसांपूर्वी जलशुद्धीकरण केंद्रावर 'फेसबूक लाईव्ह' करीत प्रशासन आणि सत्ताधारी नेत्यांवर टीका केली. चिखलीतील सुमारे २० एकर जागा प्रकल्पाला दिली असताना, या प्रकल्पातून चिखलीत पाणीपुरवठा करण्यात येणार नाही, असा आरोपही केला. त्यामुळे चिखलीकर जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या पाण्यापासून वंचित राहणार का? असा प्रश्न उपस्थित झाला होता.

दरम्यान, विकास साने यांची 'सोशल मीडिया ट्रायल' झाल्यानंतर प्रभागातील भाजपाचे माजी नगरसेवक कुंदन गायवाड, सुरेश म्हेत्रे आणि सामाजिक कार्यकर्ते विनायक मोरे, माजी स्वीकृत नगरसदस्य दिनेश यादव, संतोष मोरे, अंकुश मळेकर यांनी जलशुद्धीकरण केंद्रावरुन 'लाईव्ह' केले. यावेळी महापालिका पाणीपुरवठा विभागाचे संबंधित अधिकारी रामनाथ टकले, चंद्रकांत मुठाळे, संजय जाधव उपस्थित होते.

### महत्वाकांक्षी प्रकल्प...

समाविष्ट गावांना २० वर्षे पायाभूत सुविधांसाठी प्रतीक्षा करावी लागली. आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून संतपीठ, जलशुद्धीकरण प्रकल्प, बहुउद्देशील सभागृह यासह महत्त्वाकांक्षी प्रकल्प चिखली आणि समाविष्ट गावांमध्ये आणले. त्यामुळे समाविष्ट गावांतील नागरिकांची जीवनमान उंचावले आहे. त्यामुळे नागरिकांनी राजकीय हेतून केलेल्या भुलथापांना बळी पडू नये, असे आवाहन माजी स्वीकृत नगरसदस्य दिनेश यादव यांनी केले.

### विकास साने यांचा दावा खोटा...

चिखली येथे आंद्रा धरणातील पाणी आणून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी १०० एमएलडी क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्प लवकरच कार्यान्वयीत होणार आहे. या प्रकल्पातून चिखलीला पाणी मिळणार नाही. अन्य गावांना पाणी मिळेल, असा आक्षेप सामाजिक कार्यकर्ते विकास साने यांनी घेतला होता. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. यावर महापालिका प्रशासनाने संबंधित प्रकल्पातून सर्व समाविष्ट गावांसह शहराला पाणी पुरवठा होईल, असा जाहीरपणे खुलासा केला. त्यामुळे विकास साने यांचा दावा खोटा ठरला आहे. विशेष म्हणजे, आगामी निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून इच्छुक असलेले विकास साने यांचा 'राजकीय बनाव'ही यानिमित्ताने उघड झाला आहे.

### चिखलीच्या पाणीपुरवठ्यासाठी कटिबद्ध : कुंदन गायकवाड

कुंदन गायकवाड म्हणाले की, चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून संपूर्ण शहरातील नागरिकांना पाणी मिळणार आहे. चिखलीतील नागरिकांना पाण्यापासून वंचित ठेवणार हा दावा निव्वळ दिशाभूल आहे. समाविष्ट गावांतील पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी हा प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पामुळे चिखली, डुडुळगाव, मोशी, चऱ्होली भागातील पाणी पुरवठा सक्षम होण्यास मदत होणार आहे. चिखलीचा पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. नागरिकांनी काळजी करण्याचे कारण नाही, असे आवाहनही कुंदन गायकवाड यांनी केले आहे.

### चिखलीसाठी 30 दशलक्ष लीटरचा जलकुंभ...

चिखली आणि परिसराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी लवकरच ३० दशलक्ष लीटर क्षमतेचा जलकुंभ उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर नागरिकांची दिशाभूल करण्याचा कोणी प्रयत्न करीत असेल, तर नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते विनायक आबा मोरे यांनी केले आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये सराईत गुन्हेगाराकडून ३ ठिकाणी गोळीबार

## तब्बल सात राउंड फायर केल्याने नागरिकांमध्ये कमालीची दहशत

पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात एका सराईत गुन्हेगाराने तीन ठिकाणी हवेत गोळीबार केला. तब्बल सात राउंड फायर केल्याने नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. ही घटना मंगळवारी (दि.६) सायंकाळी पावणे सहाच्या सुमारास चिंचवड येथील चाफेकर चौक व लिंक रोडवरील पत्रा शेड आणि पिंपरीतील भाटनगर येथे घडली. शाहरुख शेख असे गोळीबार करणाऱ्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. त्याच्यासोबत आणखी दोन साथीदार असल्याची माहिती समोर आली आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हेगार शाहरुख शेख मंगळवारी सायंकाळी पावणे सहाच्या सुमारास रिक्षातून चाफेकर चौक येथे आला. तिथे त्याने हवेमध्ये तीन गोळ्या झाडल्या. त्यानंतर त्याने लिंक रोड वरील पत्रा शेड येथे दोन गोळ्या हवेत झाडल्या. त्यानंतर तो पुढे भाटनगर येथे गेला. भाटनगर मधील एका चौकामध्ये त्याने हवेत दोन गोळ्या झाडल्या. दरम्यान, आरोपीने एकाला सीसीटीव्ही कॅमेरा बंद करण्यासाठी धमकावले. तर एकाचा मोबाईल हिसकावण्याच्या प्रयत्न केला.या घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. चाफेकर चौक चिंचवड ते भाटनगर पिंपरी यादरम्यान ठीकठिकाणी बंदोबस्त तैनात करण्यात आला. नागरिकांनी घाबरून जावू नये असे पोलिसांकडून आवाहन करण्यात आले आहे.



## संपादकीय »


# उद्योगांसाठी प्रोत्साहनपर निर्णय

***महाराष्ट्रातील उद्योग गुजरातमध्ये पळविले जात असल्याच्या आरोपावरून राज्य सरकारवर ताशेरे ओढले जात आहेत. सध्याच्या उद्योगांच्या अडचणी वाढलेल्या आहेत. एकूणच रोजगारही घटलेला आहे.***

या साऱ्या गढूळ वातावरणातून बाहेर पडत राज्य सरकार उद्योजकांसाठी ठोस निर्णय घेऊ लागल्याचे आशादायक चित्र दिसत आहे. त्यामुळे उद्योजकांचे महत्त्वाचे प्रश्न सुटण्यास मदत होऊ शकते. अगदी सहकारी औद्योगिक वसाहतींच्या अडचणींबाबतही सरकार गंभीर असल्याने उद्योग जगतात समाधानाचे वातावरण निर्माण होणार आहे. दुसरीकडे महाराष्ट्र उद्योगांसाठी पूरक वातावरण आणि पायाभूत सुविधांत देशात अव्वल असल्याचा अहवाल 'यूके इंडिया बिझनेस कौन्सिल' या आंतरराष्ट्रीय संस्थेने दिला आहे. एकुणात उद्योगांसाठी पोषक वातावरण आणि सरकारने ॲक्शन मोडवर उद्योगांसाठी घेतलेले निर्णय महाराष्ट्रातील उद्योगांचा विस्तार आणि रोजगाराच्या संधीमध्ये वाढीसाठी करून घेतला पाहिजे.

उद्योगांच्या वाढीसाठी, ते चालवण्यासाठी पोषक वातावरण हवे असते. भारतातील वातावरणाविषयी 'युके इंडिया बिझनेस'ने व्यवसाय आणि उच्च शिक्षण संस्थांचे अनुभव आपल्या वार्षिक अहवालात प्रकाशित केले आहेत. विशेष म्हणजे ही संस्था कुणाही एकाच्या अखत्यारीत नसून तिची स्थापना ब्रिटन आणि भारतातील व्यापार आणि व्यावसायिक संबंध वाढविण्यासाठी करण्यात आली आहे. ही संस्था दोन्ही देशातील सरकार आणि व्यावसायिकांशी धोरणनिश्चिती आणि सुविधा, नेटवर्क यावर काम करते. या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात वरील दिलासादायक बाब स्पष्ट झालेली आहे. स्वातंत्र्यानंतर उद्योगांसाठी महाराष्ट्रात पोषक वातावरण होतेच, त्यामुळे येथे उद्योगांची भरभराट झाली. मात्र पुढे प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यात प्रत्येक राज्याने त्यासाठी प्रयत्न केल्याने उद्योगांचे जाळे देशभर पसरले. मधल्या काळात जमिनींपासून ते मूलभूत सुविधांसाठी काही जाचक अटींमुळे नवे उद्योग स्थिरावण्याचे प्रमाण कमी झाले होते. आता त्याला पुन्हा गती येऊ शकते. त्यासाठी हा अहवाल महत्त्वाचा मानायला हवा. शिवाय परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी तो आरसा होऊ शकतो. राज्यात सत्तांतर झाले. नव्या सरकारने बरेच निर्णय गतिमान पद्धतीने घेतले. त्यात सरकारने प्रत्येक खात्याच्या मंत्र्याला थेट लोकांपर्यंत जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याचाही चांगला परिणाम दिसत आहे. नाशिकमध्ये उद्योगमंत्री उदय सामंत यांनी एकदिवसीय दौरा करत उद्योजकांच्या अडचणी जाणून घेतल्या

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन




महापुरुषांची प्रतीकपूजा ओलांडणारा विज्ञानवादी समाज उभा राहावा, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अपेक्षा होती. सध्या सर्वच समाज आपापल्या महापुरुषांना जातिबद्ध करण्याच्या स्पर्धेत अडकले आहेत. खरे तर राजकीय फायद्यासाठी जातिबद्ध झालेला समाज केवळ तणाव पसरवू शकतो; तो सामाजिक फेररचना करू शकत नाही. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाला आज ६६ वर्षे होत आहेत. या काळात आंबेडकरी चळवळीत अनेक बदल झाले. दलित पँथरचा झंझावात, दलित साहित्याचा विद्रोह, दलितांचे लढे हे सारे आंबेडकरोत्तर प्रस्फोट आहेत. दलितांच्या चळवळीची ऊर्जावान स्थळे आहेत; परंतु गेल्या काही दशकांत दलित चळवळीची विशेषतः दलितांच्या राजकारणाची दिशा का बदलली? हा कळीचा प्रश्न आहे. आज आंबेडकरी समाजाने आत्मटीकेसह मूलभूत विचार केल्याशिवाय या प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत.

सध्याचा काळ बदलला आहे. जागतिकीकरणात उभे असताना आपले प्रश्न केवळ जातीय राहिले नाहीत; तर ते वर्गीय बनले आहेत. आर्थिक प्रश्नांकडे कमालीचे दुर्लक्ष करून जातीत आणि 'जय भीम'च्या नाऱ्यात रमलेल्या दलित नेत्यांना व्यापक सांस्कृतिक उन्नतीची दिशा गवसली नाही, हे कधीतरी मान्य केले पाहिजे. दलितांचे राजकारण इतके करूण आणि काव्यमय का बनले? दलित चळवळ का थंडावली आणि दलित साहित्य का गोठले? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आत्मटीकेसह शोधल्याशिवाय नवा मार्ग दिसणार नाही. आधी सांस्कृतिक उन्नती आणि त्यानंतर राजकीय प्रगती असा जगभरातल्या बदलांचा प्रवास आहे. परंतु, दलितांच्या नेत्यांनी सामाजिक-सांस्कृतिक उन्नतीऐवजी राजकारणाला अग्रक्रम देऊन आंबेडकरी विचारधारा कुंठित केली. डॉ. आंबेडकरांनी राजकीय सत्तेला अग्रक्रम दिला हे खरे असले; तरी तिला त्यांनी सर्वस्व मानले नाही. समाजाच्या समग्र सांस्कृतिक उन्नतीसाठी त्यांनी गौतम बुद्धांचा मार्ग दाखविला होता; परंतु डॉ. आंबेडकरांना अपेक्षित असलेल्या बुद्धांना समजून घेण्यात कमालीचे अपयश आलेले दिसते. बाबासाहेबांचा बुद्ध हा 'नवयानी बुद्ध' होता. तो



जगाची नवरचना करणारा होता. समाजशास्त्रज्ञ डर्कहाईमप्रमाणे बाबासाहेबांनीही धर्म हा समाजबांधणीचे काम करतो, असे मानून त्याला पवित्र मानले. बुद्धांचा धम्म दलितांच्या हाती देऊन बाबासाहेबांनी बुद्धिप्रामाण्यवादी धर्माचे आश्वासक उदाहरण समस्त भारतीयांच्या हाती दिले; परंतु संपूर्ण मानवजातीला सम्यक दृष्टी देणारे बुद्धांचे तत्त्वज्ञान जातिबाह्य रुजवण्यात दलितांना अपयश आले. खरे तर डिकास्ट होऊन नैतिकदृष्ट्या आधुनिक होण्याची ही संधी होती. परंतु, बुद्धांना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना एका विशिष्ट जातीत बंदिस्त ठेवण्यात दलित पुढाऱ्यांनी धन्यता मानली. अर्थात, आपापले महापुरुष आपल्याच जातीत कसे राहतील, यासाठी प्रत्येक समाज आज आक्रमक बनला आहे. याचा अनिष्ट परिणाम म्हणजे अस्पृश्य दलित आणि स्पृश्य दलित यांच्यातली सांस्कृतिक दरी संपलेली नाही. याशिवाय, दलितेतर बहुजन समाजाशी सांस्कृतिक मैत्रभावही जुळला नाही. तसेच, बौद्ध-मातंग आणि चर्मकार या समाजांची सवलतींसाठी एकी असली तरी अद्याप सांस्कृतिक-धार्मिक एकी नाही. त्यामुळे भटक्या आणि ओबीसी समाजाशी आंबेडकरी समाजाची सांस्कृतिक नाळ जुळणे दूरचेच आहे. दलित स्पृश-अस्पृश, शेतकरी जाती, तसेच ओबीसी, भटके, आदिवासी आणि मुस्लिमांची वैचारिक-सामाजिक व सांस्कृतिक एकी काळ सुचवतो आहे. या अनुषंगाने दलितांनी आपले विचारविश्व उभे करायला पाहिजे. सामाजिक-सांस्कृतिक आणि आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याने दलितांच्या राजकारणाची दिशा भरकटली आहे. केवळ बाबासाहेबांच्या नावाच्या घोषणा देऊन दलितांचा विकास होणार नाही, हे मान्य करून महाराष्ट्रातल्या अठरापगड जातीत विसावलेल्या बहुजन हिंदू समाजाशी सांस्कृतिक नाळ जोडण्याचे प्रयत्न केले पाहिजेत; असे आजचा काळ सांगतो आहे. डॉ. आंबेडकरांनी अत्यंत तार्किकपणे धर्मसमीक्षा केली. परंतु आंबेडकरी नेत्यांनी तत्त्वशून्य राजकीय तडजोडी करून दलितांचा बुद्धिभेद करावा ही लाजिरवाणी गोष्ट आहे. म्हणून दलित राजकारणाची वैचारिक सांस्कृतिक दिशा स्पष्ट करणे, हे आजच्या आंबेडकरवादापुढचे आव्हान बनले आहे.

# महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद कसा सोडवायचा?

**याचे उत्तर आपल्या इतिहासात शोधूनही मिळत नाही... मग भविष्य सुरक्षित करणारा एक महत्त्वाचा उपाय उरतो, तो कोणता?**

सध्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद प्रश्न राजकीयदृष्ट्या संवेदनशील झालेला आहे. नांदेड जिल्ह्यातील काही गावे तेलंगणात, तर आता सांगली जिल्ह्यातील काही गावे व कर्नाटकात होण्याची धमकी देत आहेत. तर ८६५ गावे महाराष्ट्रात सामील करा म्हणून गेल्या ६६ वर्षांपासून लढत आहेत. हा प्रश्न आता केवळ भौगोलिक सीमांपुरता नसून भाषिक अस्मिता असा झालेला आहे. या प्रश्नात काही प्रशासकीय व विकासाचे, अस्मितेचे घटक गुंतलेले आहेत. तसेच राजकीय घटकही आहेत. विशेषतः शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक आहे तर केंद्रात आणि महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटकातही बराच काळा सत्ता असलेला काँग्रेस पक्ष सुरुवातीपासूनच उदासीन राहिलेला आहे. आता याच सत्ताधारी भूमिकेत असलेल्या भाजपला मात्र कसरत करावी लागत आहे. पण स्थानिक कोणत्याही पक्षाचे नेतृत्व आपापल्या प्रदेशाचीच बाजू घेताना दिसते. न्यायालयीन पातळीवर हा प्रश्न




२००४ पासून आलेला आहे. दोन्ही राज्याकडून वेगवेगळे दावे केले जात आहेत. न्यायालयीन पातळीवर हा लढा महाराष्ट्र जिंकेल असे काहींचे मत आहे. म्हणून तर कर्नाटक सरकारने हा प्रश्न न्यायालयाबाहेरच योग्य प्रकारे सुटू शकतो, असे निवेदन न्यायालयात केलेले आहे. राज्याची निर्मिती, सीमा बदल, नवीन बदल करणे इ. अधिकार हे संसदेला असतात. त्यामुळे हा प्रश्न सोडविण्याचा अधिकार न्यायालयाला नसून संसदेला आहे. त्यासाठी या प्रश्नाची ऐतिहासिक वस्तुस्थिती जाणून घेणे गरजेचे असून यामुळे या प्रश्नाला चांगले समजून घेता येईल.

**यापूर्वी झाला, तो अन्यायच...**

हा वाद १९५६ च्या राज्य पुनर्रचना आयोगाच्या भाषावार प्रांतरचनेपासूनचा. त्याहीनंतर 'संयुक्त महाराष्ट्र' स्थापनेसाठी लढाच उभारावा लागला आणि १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळाला पण ८६५ मराठीभाषक गावे महाराष्ट्रात सामील केली गेली नाहीत. संयुक्त महाराष्ट्र समिती १९६३ मध्ये बरखास्त करण्यात आली. पण मराठी भाषकांची ही गावे भौगोलिक सलगता आणि लोकेच्छा असूनही कर्नाटकात कोंबण्यात आली. या प्रश्नासाठी सीमाभागातील जनतेने भाई दाजीबा देसाई यांच्या नेतृत्वाखाली बेळगाव इथे 'महाराष्ट्र एकीकरण समिती' स्थापन केली. सीमाप्रदेशातील 865 गावे कर्नाटकात असण्याचे मूळ कारण हे राज्य पुनर्रचना आयोगाच्या कार्यपद्धतीत आहे. या आयोगाने राज्याची पुनर्रचना करण्यासाठी खेड्याऐवजी जिल्हा हा घटक धरला. जिल्ह्यात जी भाषा असेल त्या भाषेच्या राज्याला तो जिल्हा देऊन टाकायचा आणि त्यामध्ये दुसऱ्या भाषिकांचे 70 टक्के अधिक प्रमाण असलेले तालुके असतील तर ते त्या भाषेच्या राज्यांना देऊन टाकायचे. या आयोगाने जिल्हा हा घटक निर्धारित केला असला तरी या सुत्राला आपल्या अहवालात कित्येक ठिकाणी अपवाद केलेले होते. किंबहुना केवळ बेळगाव कर्नाटकला मिळावे यासाठी हे सूत्र आयोगाने स्वीकारले होते असा निष्कर्ष निघतो. उदाहरणार्थ, १९५६ मध्ये बेल्लारीच्या बदल्यात म्हैसूरला बेळगाव-कारवार दिला गेला. पण आंध्रप्रदेश निर्मितीच्या वेळी आंध्रात आलेला बेल्लारी पुन्हा कर्नाटकला मिळाला. पण मराठी भाषिक पट्टा मात्र महाराष्ट्राला देण्यात आला नाही. आजही डांग, बेळगाव, निपाणी, कारवार व बिदर हे जिल्हे महाराष्ट्रबाहेर आहेत. खरे तर १९६० च्या विभागीय मंडळ (झोनल कौन्सिल)च्या १४ सदस्यीय समितीच्या अहवालाने १९५१ ची जनगणना आधारभूत धरून पुढील मुद्द्यांवर ८१४ गवांची मागणी केली : (१) खेडे हा घटक जिल्हा नव्हे, (२) भौगोलिक सलगता, (३) मराठी व कानडी भाषकांची सापेक्ष बहुसंख्या, (४) लोकेच्छा. पण या समितीच्या अहवालाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्यामुळे १९६६ ला सेनापती बापट यांना बेमुदत उपोषण करावे लागले. मग महाराष्ट्राच्या मागणीनुसार, केंद्र सरकारने न्या. मेहरचंद महाजन कमिशनची स्थापना १९६६ मध्ये केली. या आयोगाने ८६५ गावांपैकी २६४ गावेच महाराष्ट्रात घालण्याची केंद्राला शिफारस केली. १९६९ ला बाळासाहेब ठाकरे

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# केंद्रातील महाशक्ती महाराष्ट्राचे तुकडे करायला निघाली!

## राष्ट्रवादीची शिंदे-फडणवीसांवर जहरी टीका

**। मुंबई । महाईन्यूज ।**

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचा प्रश्न दिवसेंदिवस चिघळत चालला आहे. महाराष्ट्राच्या मंत्र्यांना बेळगावात येऊ न देण्याची भूमिका घेतलेल्या कन्नड रक्षण वेदिके या संघटनेने महाराष्ट्राच्या वाहनांवर हल्ला केला आहे. कन्नड रक्षण वेदिके संघटनेचे नारायण गौडा हे बेळगाव दौऱ्यावर आहेत. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बेळगावमध्ये रास्ता रोको आंदोलन केलं.**



हिरबागेवाडी येथील टोलनाक्यावर महाराष्ट्राच्या सहा वाहनांवर या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केली आहे. त्यानंतर राज्यातील परिस्थिती चिगळली आहे. पुण्यात कर्नाटक परिवहन मंडलच्या गाड्यांना फासले काळे. तर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेवून निषेध व्यक्त केला आहे.

**⏭ महाराष्ट्राच्या सहा वाहनांवर या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केली आहे. त्यानंतर राज्यातील परिस्थिती चिगळली आहे. पुण्यात कर्नाटक परिवहन मंडलच्या गाड्यांना फासले काळे. तर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेवून निषेध व्यक्त केला आहे.**

दरम्यान राष्ट्रवादीचे प्रवक्ते रविकांत वरपे यांनी ट्विट करत भाजप सरकारवर टीका केली आहे. कर्नाटकमध्ये देखील भाजप सरकार आहे आणि महाराष्ट्रत शिंदे- भाजपचं सरकार आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हालचाल करत नाही अशी चर्चा आता होवू लागली आहे. तर वरपे यांनी ट्विटमध्ये लिहिलं आहे की, 'शिंदे फडणवीस यांच्या पाठीशी असणारी केंद्रातील महाशक्ती आता महाराष्ट्राचे तुकडे करायला निघाली आहे. पण राज्यातील शिंदे फडणवीस मात्र बघ्याची भुमिका घेत आहे. असे नामर्द सरकार राज्याच्या इतिहासात कधी पाहिले नाही.' असं ट्विट त्यांनी केले आहेत.

## बाबासाहेब अमर रहें! मुख्यमंत्र्यांसह अनेक राजकारण्याकडून अभिवादन

**। मुंबई । महाईन्यूज ।**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने त्यांना अभिवादन करण्यासाठी ६ डिसेंबर रोजी दादर चैत्यभूमीवर लाखो अनुयायांचा 'निळा सागर' लोटला होता. "गेला माणुसकी भीम दाऊन,पाणी चवदार तळ्याचे चाखून", अशा ओळी गात"डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर रहे", अशा घोषणा देत लाखो अनुयायी यांनी दादर, चैत्यभूमी, शिवाजी पार्क परिसर दणाणून सोडला.

महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरद्वारे यंदाही पुष्पवृष्टी करण्यात आली. तर मुंबई महापालिकेने सुरक्षिततेच्या दृष्टीने यंदा प्रथमच ' ड्रोन' चा वापर केला. यावेळी, राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विरोधी पक्ष नेते अजितदादा पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे,वंचित

## “लवकरच इंदू मिल स्मारकाचे काम पूर्ण करू”

### देवेंद्र फडणवीसांचे चैत्यभूमीवरून आश्वासन

**। मुंबई । महाईन्यूज ।**

महापरिनिर्वाणदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जगभरातून अभिवादन केले जात आहे. आंबेडकरी अनुयायी आज सकाळपासूनच चैत्यभूमीवर अभिवादनासाठी जमा होत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील चैत्यभूमीवर जाऊन डॉ. आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळेच



एक सामान्य व्यक्ती पंतप्रधान होऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारकाचे काम लवकरात लवकर केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. “आजचा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प घेण्याचा दिवस आहे. या देशाची दशा आणि दिशा दोन्ही बदलण्याचं काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलं. त्यांनी आपल्याला संविधान दिले. या संविधानाच्या मार्फत त्यांनी खऱ्या अर्थाने देशात समतेचं, लोकशाहीचं राज्य आणले. व्यक्तीला जन्माने, जातीने, धर्माने, भाषेने समान अधिकार असेल. कोणामध्येही भेद करता येणार नाही असे बीजमंत्र देणारे हे संविधान आहे,” अशा भावना देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

“डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाच्या पाठीवरचे सर्वोत्तम संविधान आपल्याला दिले. आज आपला देश प्रगती करत आहे. संविधानाने आपली लोकशाही जिवंत ठेवली. सामान्यातील सामान्य माणसाला सर्वोच्च स्थानी जाण्याचा मार्ग आणि संधी संविधानाने उपलब्ध करून दिली. आज खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आभार मानण्याकरिता तसेच त्यांचे शतश: नमन करण्यासाठी आपण त्यांना मानवंदना देत आहोत,” अशा भावना देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

# 'दुसऱ्या राज्यात पळून जाता येतं, पण कर्नाटकात'

## आदित्य ठाकरे CM शिंदेंवर बरसले

**। मुंबई । महाईन्यूज ।**

**सध्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न चांगलाच पेटला आहे. नेत्यांकडून आरोप प्रत्यारोप होत असतानाच आज कर्नाटकातील बेळगाव येथे महाराष्ट्रातील वाहनांवर दगडफेक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. तसेच कर्नाटक सरकारने परवानगी न दिल्याने शिंदे-फडणवीस सरकारचे मंत्री शंभूराज देसाई आणि चंद्रकांत पाटील यांचा बेळगाव दौरा रद्द झाला आहे, यावरून आदित्य ठाकरे यांनी खोचक शब्दात टीका केली आहे.**

आदित्य ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारला धारेवर धरत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे. "एका बाजूला शेतकरी त्रस्त आहेत. महिलांवर अत्याचार वाढत आहेत. उद्योग महाराष्ट्रातून एका



राज्यात पाठवलेत. आता आपल्या महाराष्ट्राची गावं दुसऱ्या राज्यात पळवण्याचा प्रयत्न सुरु आहे. पण घटनाबाह्य मुख्यमंत्री मात्र ह्या सगळ्यावर गप्प का?" असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला आहे.

### महाराष्ट्रासाठी शरमेची बाब..

**कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांच्या दमदाटीला घाबरून महाराष्ट्रातील घटनाबाह्य सरकारचे मंत्री तंतरले आणि दौरा स्थगीत करून बसले. ही अखंड महाराष्ट्रासाठी शरमेची, दुःखाची गोष्ट आहे, असेही आदित्य ठाकरेंनी म्हटले आहे. शिवसेनेत बंड करून गुवाहाटीला गेलेल्या एकनाथ शिंदे आणि आमदारांवर आदित्य ठाकरे यांनी निशाणा साधला आहे, "महाराष्ट्रधर्माशी केलेली गद्दारी आहे! स्वतःसाठी दुसऱ्या राज्यात पळून गेले, पण महाराष्ट्रासाठी बेळगावला जात नाहीत?" असे त्यांनी म्हटले आहे.**

### पण महाराष्ट्रासाठी..

**"राग ह्या गोष्टीचा येतो की, खरंतर जो विषय चर्चेचा नाही त्यावर चर्चा करायला निघाले होते, पण कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी दम देताच आपले मंत्री घाबरून तिथे गेलेच नाहीत. एवढं हतबल सरकार महाराष्ट्रात कधीच नव्हतं!" असंही आदित्य ठाकरे म्हणाले आहेत.**

# अपक्ष उमेदवार ठरणार ‘किंगमेकर’?

## भाजपा-काँग्रेसमध्ये सत्तेसाठी अटीतटीची लढाई!

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**हिमाचल प्रदेशमध्ये सत्तेसाठी भाजपा आणि काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांमध्ये जोरदार रस्सीखेच पाहायला मिळत आहे. ८ डिसेंबर रोजी निवडणुकीचा निकाल जरी असला तरी एक्झिटपोलनुसार या दोन्ही पक्षात अटीतटीची लढत राहणार असल्याचे चित्र आहे. महत्तवाचे म्हणजे या निवडणुकीत अपक्ष उमेदवार किंगमेकर ठरणार असल्याचा अंदाज आहे. कारण, जवळपास ८ ते १० अपक्ष उमेदवार विजयी होतील असं एक्झिट पोलनुसार समोर आलं आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांकडून अपक्षांना आपल्या बाजून वळवण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत.**




**हिमाचल प्रदेश विधानसभेच्या ६८ जागांसाठी ४१२ उमेदवार रिंगणात होते आणि या निवडणुकीसाठी १२ नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात ७५.६ टक्के मतदान झाले होते. या निवडणुकीत मुख्यमंत्री जयराम ठाकुर, माजी मुख्यमंत्री विरभद्र सिंहांचे पुत्र विक्रमादित्य सिंह यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. तर, हिमाचल प्रदेशातील नागरिक भाजपाला पुन्हा संधी देतील, की विरोधी पक्ष काँग्रेससाठी सत्तेचा मार्ग मोकळा करतील, याची सर्वांना उत्सुकता आहे. ८ डिसेंबर रोजी निवडणुकीचा निकाल आहे. मात्र तत्पुर्वी विविध एक्झिट पोलनुसार निकाल समोर आले आहे.**

हिमाचल प्रदेश विधानसभेच्या ६८ जागांसाठी ४१२ उमेदवार रिंगणात होते आणि या निवडणुकीसाठी १२ नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात ७५.६ टक्के मतदान झाले होते. या निवडणुकीत मुख्यमंत्री जयराम ठाकुर, माजी मुख्यमंत्री विरभद्र सिंहांचे पुत्र विक्रमादित्य सिंह यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. तर, हिमाचल प्रदेशातील नागरिक भाजपाला पुन्हा संधी देतील, की विरोधी पक्ष काँग्रेससाठी सत्तेचा मार्ग मोकळा करतील, याची सर्वांना उत्सुकता आहे. ८ डिसेंबर रोजी निवडणुकीचा निकाल आहे. मात्र तत्पुर्वी विविध एक्झिट पोलनुसार निकाल समोर आले आहे. Aaj Tak-Axis My India च्या एक्झिट पोलनुसार हिमाचलप्रदेशमध्ये भाजपाला २४ ते ३४ आणि काँग्रेसला ३० ते ४० जागा मिळत असल्याचे दिसत आहे. आम आदमी पार्टीचा सुपडासाफ होण्याची चिन्ह आहेत. याशिवाय ४ ते ८ जागांवर अपक्ष उमेदवार निवडून येणार असल्याचे दाखवण्यात आले आहे. बहुमतासाठी ३५ जागा जिंकाव्या लागणार आहेत. भाजपाला ४२ टक्क मतं, काँग्रेसला ४४ टक्के आणि आम आदमी पार्टीला केवळ दोन टक्के मत मिळताना दिसत आहेत.विविध एक्झिट पोलच्या निकालानुसार जवळपास ८ ते १० अपक्ष उमेदवार निवडून येण्याची चिन्हं आहे. अशावेळी दोन्ही पक्षात अटीतटीची लढत असल्याने दोन्ही पक्षांसाठी अपक्षांचा पाठिंबा मिळवणे अत्यंत आवश्यक आहे. अपक्ष उमेदवारच किंगमेकरची भूमिका निभावणार असल्याचे चित्र हिमचालमध्ये दिसत आहे.

मागील निवडणुकीत भाजपाने ६८ पैकी ४४ जागांवर विजय मिळवत बहुमताने सरकार बनवले होते. तर काँग्रेसला केवळ २१ जागा जिंकता आल्या होत्या.

# कर्नाटकनंतर आता मध्यप्रदेश सीमावाद?

## बुलढाण्यातील ४ गावांचा राज्यसरकारला इशारा



**। मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

राज्यात कर्नाटकनंतर आता मध्यप्रदेश सीमावाद प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. बुलढाण्यातील ४ गावांनी राज्यसरकारला इशारा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद चांगलाच पेटला आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील ४० गावांवर दावा सांगितला आहे. तसेच, सोलापुरातही हक्क दाखवला आहे. दरम्यान, सोलापुरातील काही गावांनी राज्यसरकार कर्नाटकात जाण्याचा इशारा दिला आहे.

अशातच आता मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाण्यातील ४ गावांनी मध्यप्रदेशात जाण्याचा निर्णय घेतला आहे. मध्यप्रदेशच्या सीमेवरील बुलढाण्यातील 4 गावातील नागरिकांनी मध्यप्रदेश जाण्याचा निर्णय घेतला आहे. मूलभूत सुविधा मिळत नसल्याचा आरोप या गावकऱ्यांनी केला आहे. पाणीप्रश्न, आरोग्य सुविधा, शिक्षण अशा मूलभूत सुविधा मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे कर्नाटक वादासोबत आता मध्यप्रदेश सीमावादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# “हातावर हात ठेऊन शांत बसणार नाही”

### नोटाबंदीच्या निर्णयावर सुप्रीम कोर्ट

**।नागपूर ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

केंद्र सरकारने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी ५०० आणि एक हजार रुपये किमतीच्या चलनी नोटा बाद करण्याचा निर्णय घेतला होता. खोट्या चलनी नोटा, काळा पैसा आणि दहशतवाद रोखण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतल्याचं सांगितलं होतं. पण केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरं जावं लागलं होतं. नोटा बदलून घेताना काही नागरिकांचा रांगेत उभं राहिल्याने मृत्यू झाला होता. त्यामुळे सरकारच्या या निर्णयाला आव्हान देण्याऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या.

केंद्र सरकारच्या नोटाबंदीच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना आज सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की, नोटाबंदी हा केवळ आर्थिक धोरणात्मक निर्णय असल्याने न्यायालय याबाबत मूक प्रेक्षकाची भूमिका बजावणार नाही



किंवा हातावर हात ठेऊन शांत बसणार नाही. हा केवळ आर्थिक निर्णय आहे, याचा अर्थ असा नाही की आम्ही हातावर हात ठेऊन शांत बसू. हा निर्णय नेमका कसा घेतला गेला? हे आम्ही कधीही तपासू शकतो,” असं सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. व्ही. नागरथना म्हणाले. ही सुनावणी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे पार पडली. न्यायालयाच्या या प्रश्नानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आपली भूमिका मांडली. आरबीआय अधिनियम-१९३४ अंतर्गत देशात नोटाबंदीचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच यासाठी योग्य ती प्रक्रिया राबवण्यात आली होती, असंही आरबीआयकडून सांगण्यात आलं.

# गुजरातमध्ये पुन्हा भाजपच!

## मतदानोत्तर चाचण्यांचा अंदाज : हिमाचलमध्ये चुरस

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजप मोठे बहुमत मिळवून सलग सातव्यांदा सत्तेवर येईल, असा अंदाज मतदानोत्तर चाचण्यांनी सोमवारी वर्तवला. हिमाचल प्रदेशात मात्र सत्ताधारी भाजप आणि काँग्रेसमध्ये अटीतटीची लढत होऊन भाजप काठावरच्या बहुमताद्वारे सलग दुसऱ्यांदा सत्ता स्थापन करेल, असा चाचण्यांचा निष्कर्ष आहे.

गुजरात विधानसभा निवडणुकीच्या मतदानाचा दुसरा टप्पा सोमवारी पार पडल्यानंतर विविध संस्थांच्या मतदानोत्तर सर्वेक्षणांतील अंदाज जाहीर करण्यात आले. त्यानुसार गुजरातमध्ये भाजपला १८२ जागांपैकी ११७ ते १५१ जागा आणि काँग्रेससह त्याच्या



### दिल्ली पालिकेत ‘आप’ला बहुमताचा अंदाज

**नवी दिल्ली : दिल्ली महापालिकेत ‘आप’ला स्पष्ट बहुमत मिळेल आणि भाजपची १५ वर्षांची सत्ता संपुष्टात येईल, असा अंदाज तीन मतदानोत्तर चाचण्यांनी सोमवारी वर्तवला. ‘आज तक- ॲक्सिस’च्या अंदाजानुसार ‘आप’चे उमेदवार १४९ ते १७१ प्रभागांमध्ये विजय संपादन करतील, तर भाजपला ६९ ते ९१ जागा मिळतील. ‘टाइम्स नाऊ-इटीजी’च्या चाचणीनुसार ‘आप’ला १४६ ते १५६, भाजपला ८४ ते ९४ आणि काँग्रेसला ६ ते १० प्रभागांमध्ये विजय मिळेल. ‘द न्यूज एक्स’च्या सर्वेक्षणात ‘आप’ला १५९ ते १७५ आणि भाजपला ७० ते ९२ जागा मिळतील.**

मित्रपक्षांना १६ ते ५१ जागा मिळतील, असा अंदाज आहे. आक्रमक प्रचाराद्वारे मोठी हवा निर्माण केलेल्या ‘आप’ला मात्र तीन ते १३ जागांवर समाधान मानावे लागेल, असे अंदाज आहेत. बहुमतासाठी ९२ जागा जिंकणे आवश्यक आहे. हिमाचलमध्ये भाजपला २४ ते ४१, तर काँग्रेसला २४ ते ४० जागा मिळतील, असे भाकीत वर्तवण्यात आले आहे. ‘आप’च्या खात्यात जेमतेम तीन जागा पडतील, असा अंदाज आहे. या राज्यात विधानसभेच्या ६८ जागा असून बहुमतासाठी ३५ हा जादुई आकडा आहे. तथापि, दोन सर्वेक्षणांचे अपवाद वगळले तर सर्वच मतदानोत्तर चाचण्यांच्या अंदाजांनुसार हिमाचलमध्ये भाजपच निर्विवाद बहुमताद्वारे पुन्हा सत्ता स्थापन करेल. भिन्न अंदाज वर्तवणाऱ्या दोन चाचण्यांनुसार भाजप आणि काँग्रेसमध्ये सत्तेसाठी तीव्र रस्सीखेच होईल.

**गुजरातमध्ये दुसऱ्या टप्प्यात ५८.८० टक्के मतदान**

गुजरात विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात सोमवारी ५८.८० टक्के मतदान झाले.

# काहीतरी नवं येतंय! अश्विनी भावे-अजिंक्य देव 25 वर्षांनी एकत्र..

अश्विनी भावे हे सिनेसृष्टीतील एक नावाजलेलं नाव. गेली २ दशके त्या चित्रपट क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांनी केलेल्या सर्वच भूमिका या रसिकप्रेक्षकांच्या मनात अजूनही जिवंत आहेत. फक्त मराठीतच नाही तर त्यांच्या कलाकृतीने बॉलीवूड मध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. बॉलीवूडच्या बड्या बड्या स्टार्ससोबत त्यांनी काम केलं आहे. फक्त फॅन्सच नाहीतर चित्रपट समीक्षकांनाही त्यांच्या कामाची नेहमीच तारीफ केली आहे. आज अश्विनी भावे यांनी अजिंक्य देव यांच्यासोबत फोटो शेयर करत खास पोस्ट लिहिली आहे.

अभिनेत्री अश्विनी भावे यांनी एके काळी मराठी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे.



'सरकारनामा', 'धाकडेबाज', 'बनवाबनवी', 'हळद रुसली, कुंकू हसलं', वजीर असे अनेक चित्रपट त्यांनी हिट केले आहे. अभिनेते अजिंक्य देव यांच्यासोबतचा 'सरकारन नामा' हा चित्रपट विशेष गाजला. या चित्रपटाला जवळपास २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. आता २५ वर्षांनी अश्विनी आणि अजिंक्य पुन्हा एकत्र येत आहे. अश्विनी भावे यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये अश्विनी आणि अजिंक्य एक देव एकत्र आहेत. या शूटिंग लोकेशनवर. या फोटोला कॅप्शन देताना अश्विनी म्हणाल्या, 'सरकारनामा' या चित्रपटाचे रौप्य महोत्सवी वर्ष आम्ही साजरा करत आहोत. अशातच मी आणि अजिंक्य आम्ही एकत्र पुन्हा चित्रीकरण करत आहोत, तेही २५ वर्षांनी..' त्यांच्या या पोस्टने चांगलीच उत्सुकता वाढवली आहे. आता नवीन काय पाहायला मिळणार याचे वेध चाहत्यांना लागले आहे.

# कान्स फिल्म फेस्टिव्हलनंतर फिफा वर्ल्डकपमध्ये देखील दीपिका पादुकोणचा जलवा

बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण ग्लोबल आयकॉन म्हणून देखील ओळखली जाते. तिने बॉलिवूडसोबतच हॉलिवूडमध्ये देखील आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. यावर्षी दीपिकाने कान्स फिल्म फेस्टिव्हलनंतरमध्ये देखील भारताचे प्रतिनिधित्व केले होते. ज्यानंतर तिचे खूप कौतुक देखील करण्यात आले. दरम्यान, आता दीपिकाला फीफा वर्ल्डकपच्या फायनलमध्ये ट्रॉफीचे अनावरण करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

दीपिका पादुकोण यंदा कतरमध्ये सुरु असलेल्या फीफा वर्ल्डकपच्या फायनलमध्ये ट्रॉफीचे अनावरण करणार आहे. फीफा वर्ल्डकपचा फायनल 18 डिसेंबर 2022 रोजी आहे. यासाठी दीपिका लवकरच



कतरसाठी रवाना होणार आहे. दरम्यान, अजून याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाही. दीपिकाने याचं वर्षी कान्स फिल्म फेस्टिव्हलनंतरमध्ये देखील भारताचे प्रतिनिधित्व केले होते. तो क्षण दीपिकासाठी आणि तिच्या चाहत्यांसाठी खूप खास होता.

‘फायटर’ चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे दीपिका

दीपिका सध्या तिच्या आगामी ‘फायटर’ चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटामध्ये तिच्यासोबत अभिनेता ऋतिक रोशन देखील मुख्य भूमिकेत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ आनंद करत आहे. शिवाय या चित्रपटामध्ये अनिल कपूर देखील महत्वाच्या भूमिकेत आहे. या चित्रपटाव्यतिरिक्त दीपिका शाहरुख खानसोबत ‘पठाण’ चित्रपटामध्ये दिसणार आहे. हा चित्रपट जानेवारीमध्ये प्रदर्शित होणार आहे. शिवाय ती प्रभाससोबत देखील एका चित्रपटामध्ये झळकणार आहे. तसेच ती रणवीर सिंहच्या ‘सर्कस’ चित्रपटामधील एका गाण्यामध्ये दिसणार आहे. त्यानंतर ती शाहरुखच्या ‘जवान’ चित्रपटामध्ये कॅमियो भूमिकेत दिसेल.

# डोक्यावर पगडी, हातात भाला, ढाल अन्...; गायिका आर्या आंबेकरच्या पोस्टने वेधलं लक्ष

मराठी कलविश्वातील लोकप्रिय गायक आर्या आंबेकर तिच्या सुमधून आवाजाने चाहत्यांना मंत्रमुग्ध करत असते. आर्या सोशल मीडियावरही सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. सध्या आर्याने शेअर केलेल्या फोटोंची चर्चा रंगली आहे.

आर्या आंबेकरने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन किल्ल्यावरील काही फोटो शेअर केले आहेत. या फोटोमध्ये तिने जीन्स टॉप असा पोशाख करत डोक्यावर पगडी आणि हातात ढाल-भाला घेतल्याचं दिसत आहे. आर्याच्या या नव्या लूकमधील फोटोंमुळे चाहतेही संभ्रमात पडले आहेत.

“एका मॉर्डन स्त्रीच्या आयुष्यातील दिवस. कोकरूप्रमाणे(बकरीचे पिल्लू) सौम्य आणि वाघाप्रमाणे भयंकर ती परिस्थितीनुसार रुप धारण करते” असं कॅप्शन तिने या पोस्टला दिलं आहे. आर्या तिचा नवीन व्लॉग घेऊन चाहत्यांच्या



भेटीला येणार असल्याचं तिने पोस्टमध्ये म्हटलं आहे. तिच्या या पोस्टवर चाहत्यांनी कमेंटही केल्या आहेत. आर्या आंबेकर एक लोकप्रिय गायिका आहे. ‘सारेगमप लिटिल चॅम्प्स’मधून तिला प्रसिद्धी मिळाली. ‘आर्यासा ऑफिशिअल’ या नावाने तिचं युट्यूब चॅनेल आहे. तिचे युट्यूबवर दोन लाखांहून अधिक सबस्क्रायबर्स असून अनेक व्हिडीओ ती तिच्या चॅनेलवरुन शेअर करत असते.

# मनीष मल्होत्राची बर्थ डे पार्टी अन रेखा नवरीसारखी सजली...

बॉलिवूड मधील प्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्राने 5 नोव्हेंबरला त्यांचा 56 वा वाढदिवस साजरा केला. या खास दिवशी मनीषने त्याच्या घरी एक मोठी पार्टी दिली, ज्यामध्ये संपूर्ण बॉलिवूडकरी उपस्थित होते. त्याचवेळी या पार्टीचे व्हिडीओ समोर आले आहेत, जे पाहून चाहते आनंदीत झाले आहे. मात्र या पार्टीत मनीषची नव्हे तर रेखाचीच चर्चा जास्त रंगली आहे.

या पार्टीत जवळपास सर्वच बॉलिवूडच्या अभिनेत्रींनी हजेरी लावली होती.सोशल मीडियावर या पार्टीचे काही फोटो शेअर व्हायरल होत आहे. या फोटोंमध्ये रवीना टंडन खूपच कॅज्युअल लूकमध्ये दिसत आहे. मात्र रेखा पार्टीत पोहोचली तेव्हा तिचं सुंदर रूप सगळ्यांना भुरळ पाडायला पुरेसे होतं. सर्वात उठून दिसत होती ती एव्हरग्रीन रेखा.

रेखाने या पार्टीसाठी सोनेरी रंगाचा अनारकली कुर्ता निवडला होता. ज्याच्या कुर्त्यात गोल्डन गोटा वर्क केलेलं होतं. तिच्या कुर्त्यावर सोनेरी जरीचे वर्क होते. रेखाने सोनेरी रंगाच्या कुर्त्यासोबत हेवी ज्वेलरी मॅच केली. हेवी सोनेरी कानातले आणि नेकपीस सोबतच रेखाने तिला पूर्णपणे पारंपारिक लूक दिसावा यासाठी मांगटिका देखील घातला होता. त्याचबरोबर कपाळावर टिकली आणी मरून रंगाची डार्क लिपस्टिक लावायली होती आणि केसांचा जूडा बनवला होता. ज्यावर गजरा सुंदर दिसत होता. इतकच नाही तर रेखाच्या या सर्व गोल्डन लूकबरोबर तिने उंच टाचांच्या सँडलने सर्वांच लक्ष वेधले. रेखाने या कुर्त्यासोबत मॅचिंग स्ट्रेपी हील्स घातल्या होत्या. ज्यामध्ये टाचांची उंची खूप जास्त होती आणि सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. रेखा अनेकदा



# ब्राझीलच्या खेळाडूंनी दिग्गज फुटबॉलपटू पेलेला विजय केला समर्पित

## दक्षिण कोरिया विश्वचषकातून बाहेर

**दोहा । महाईन्यूज । वृत्तसंस्था**




फिफा विश्वचषक २०२२ च्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये दक्षिण कोरियाचा ४-१ असा पराभव केल्यानंतर, ब्राझीलच्या खेळाडूंनी हा विजय महान खेळाडू पेलेला समर्पित केला. आजारी असलेल्या पेले यांच्यावर साओ पाउलो येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दक्षिण कोरियावर विजय मिळवल्यानंतर ८२ वर्षीय पेले यांचे पोस्टर्स दोहा येथील स्टेडियम ९७४ येथे ब्राझीलच्या खेळाडूंनी लावले आहेत. फुटबॉल इतिहासातील महान खेळाडूंपैकी एक असलेले पेले गंभीर आजारी आहेत. मात्र, तो बरा होऊन घरी परतेल, असा विश्वास त्याच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे.

दक्षिण कोरियाविरुद्धच्या सामन्यात ब्राझीलकडून विनिशियस ज्युनियर, नेमार, रिचर्डसन आणि लुकास पक्वेटाने गोल केले. घोट्याच्या दुखापतीतून पुनरागमन करणाऱ्या नेमारने सांगितले की, “पेले सध्या कोणत्या परिस्थितीतून जात आहे याबद्दल बोलणे कठीण आहे, परंतु मी त्यांना शुभेच्छा देतो. ते लवकरच बरे होतील अशी देवाजवळ मी प्रार्थना केली आहे.” “मला आशा आहे की तो शक्य तितक्या लवकर बरे होतील आणि आम्ही किमान त्यांना विजय मिळवून आनंद देऊ शकतो,” नेमारने ग्लोबोला सांगितले. पोटाच्या कर्करोगाशी पेलेची लढाई खेळाडूंना विक्रमी सहाव्यांदा फिफा चॅम्पियन बनण्याची प्रेरणा देत आहे. पेलेने ब्राझीलसाठी तीन वेळा विश्वचषक जिंकला आहे. विनिशियस म्हणाले, “त्यांना आमच्याकडून खूप चांगल्या कामगिरीची अपेक्षा असून आम्ही त्यासाठी खूप जोर लावत आहोत. या खेळत अधिक ताकदीची गरज असते. पेले यांना आमच्याकडून हा विजय समर्पित करत आहोत, जेणेकरून या विजयाच्या बातमीने ते या परिस्थितीतून बाहेर येतील आणि आम्ही त्यांच्यासाठी चॅम्पियन होऊ शकू.”

रिचर्डसनने त्यांच्या शेवटच्या गट टप्प्यातील सामन्यात जवळपास संपूर्ण पहिल्या संघाला विश्रांती देण्याच्या प्रशिक्षक टिटच्या निर्णयाचे कौतुक केले. बाद फेरीत ब्राझीलने सुरुवातीच्या सामन्यांमध्ये चांगली कामगिरी करत बाद फेरीतील आपले स्थान आधीच पक्के केले होते. मात्र, त्यांच्या संघाला अखेरच्या सामन्यात कॅमेरूनविरुद्ध १-० असा पराभव स्वीकारावा लागला होता. रिचर्डसन म्हणाला, “आम्ही पहिल्या मिनिटापासून जलद खेळलो आणि शेवटच्या सामन्यात आम्ही संघाच्या एका भागाला विश्रांती दिली होती, त्यामुळे तुम्हाला बॉसला श्रेय द्यावे लागेल.”

ब्राझिलचे प्रशिक्षक टिटेच्या अनेक बदलांचा अर्थ असा आहे की त्याने आता संपूर्ण २६ जणांच्या संघाला स्पर्धेत खेळण्याची संधी दिली, तिसरा पर्याय असलेला गोलकीपर वेव्हर्टन अगदी कोरियाविरुद्ध शेवटची १० मिनिटे खेळला.

त्याबद्दल तो म्हणाला की “मी आलो तेव्हा खेळ व्यावहारिकरित्या संपला होता, परंतु कोणत्याही गोलरक्षकाला गोल करणे आवडत नाही.”

# महिलांची ‘आयपीएल’ स्पर्धा महत्त्वाची-हरमनप्रीत कौर

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

महिलांची ‘आयपीएल’ स्पर्धा नवोदित क्रिकेटपटूंच्या आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटमधील अंतर दूर करण्यास महत्त्वाची ठरेल, असे मत भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने व्यक्त केले. महिलांच्या ‘आयपीएल’ला मार्चमध्ये सुरुवात होणार आहे. हरमनप्रीत, स्मृती मानधना यांच्यासह देशातील बहुतेक प्रमुख खेळाडू या स्पर्धेत सहभागी होतील.

परदेशी खेळाडूंचाही यात सहभाग असेल. ‘आयपीएल’ हे महिला क्रिकेटपटूंसाठी गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ असेल. पण, दृष्टिकोन आणि विचार यामध्ये एका रात्रीत बदल होत नाहीत. त्याला थोडा वेळ जावा लागतो. तसेच खेळाडूंनाही ‘आयपीएल’शी जुळवून घेण्यास थोडा वेळ जावा लागेल, असेही हरमनप्रीत म्हणाली.

‘आयपीएल’मध्ये खेळाडूंना एकाच वेळी परदेशी खेळाडूंबरोबर आणि विरुद्धही खेळायला मिळते. त्यांना दडपणाचा सामना करण्याची सवय होते. देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळताना त्यांना अशा कुठल्याच दडपणाचा सामना करावा लागत नाही. त्यामुळेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील दरी दूर करण्याचे काम ‘आयपीएल’ करेल, असा विश्वास असल्याचेही हरमनप्रीतने सांगितले.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही